## डॉ. सुप्रिया लोणकर



डॉ. सुप्रिया लोणकर, एमबीबीएस, डीपीएम, अमरावती व मुंबईतून पूर्ण केले. त्या मनोविकारतज्ञ म्हणून गेली १२ वर्षे कार्यरत आहेत. नित्यानंद सोबत २००८ पासून काम करत आहेत. येथे त्या औषधोपचार तसेच मनोविकार झालेल्या व्यक्तींच्या पालकांची उपचारापश्चात काळजी कशी घ्यावी याबद्दल कार्यशाळाही घेतात.

सरिता, १७ वर्षांची, १२ वी शिकणारी, चुणचुणीत मुलगी......अचानकपणे घरी खुप चिडचिड करायला लागली, भावासोबत छोट्या छोट्या गोष्टींवरून भांडायला लागली.. आई-वडिलांना म्हणायला लागली की तुम्ही फक्त भावाचे लाड करता. आईवर चिडचिड सुरु झाली, शिवाय शेजाऱ्यांशी संपर्क ठेवायची नाही असे ती म्हणत असे. इतर घरातील लोकांनीही शेजाऱ्यांशी बोलू नये असे तिला वाटायचे. घरात एकटी असली की दारे-खिडक्या बंद करून बसायची. कॉलेजमध्ये कधी जायची तर कधी नाही जायची. मैत्रिणींसोबत पटायचे नाही, सारखे वाद व्हायला लागले. आईने विचारले की तु हल्ली अशी का वागतेस? तर म्हणायची की मला तुमच्यासोबत राहायचे नाही. मला हॉस्टेलमध्ये ठेवा. मी तिथेच राहीन. खूप हट्टीपणा वाढला होता. हा सगळा प्रकार अवघ्या तीन चार महिन्यात वाढला. काहीतरी उपाययोजना करावी म्हणून तिची आई तिला बळे- बळे माझ्याकडे घेऊन आली व म्हणाली , मॅडम समजावा हिला, खूप हट्टी व चिडचिडी झाली आहे. होस्टेलला एकटी राहीन असे म्हणतेय. तिच्याशी जेव्हा संपूर्ण बोलणं झालं, तिला विश्वासात घेण्यात आलं, तेव्हा सरिता सांगायला लागली की शेजारील एक जोडपं तिचं वाईट करणार आहे, तिच्यावर कसला तरी राग काढणार आहेत. त्यापासून सुटका हवी म्हणून तिला घरी राहायचे नव्हते. त्यामुळे ती घरात एकटी असताना दारे-खिडक्या लावून बसते. आईचा माझ्यावर विश्वास नाही म्हणून चिडचिड होते. अशी लक्षणे तिला गेल्या काही महिन्यात सतत जाणवत होती.

संपूर्ण चर्चेनंतर नेमकं काय डायग्नोसीस करावं असा प्रश्न पडला. कारण स्किझोफ्रेनियाच्या सुरुवातीच्या लक्षणांमध्ये पण पेशंटना सुरवातीच्या काळात चिडचिड होणे, संशय वाटणे, भिती वाटणे इत्यादी सारखी लक्षणे दिसायला लागतात. परंतु हि सगळी लक्षणे असूनही इतक्या लवकर हा स्किझोफ्रेनिया इतका तीव्र होत नाही. तिच्या आईनी विचारले कि ती डिप्रेस झाली असेल का? पण सरिताला उदासीनता नव्हती, तिचा कामातील उत्साह टिकून होता. प्रामुख्याने तिला चिडचिड होत होती व भीतीही खूप वाटत होती. त्यामुळे तिच्यावर उपचार करायचे ते स्कीझोफ्रेनीफॉर्म डीसऑर्डर म्हणून असे ठरले.

आठ दिवसांचे औषध देऊन तिला घरी पाठवले. जशी आठवड्याने ती परत आली, बऱ्याच प्रमाणात तिची चिडचिड कमी झाली होती. पण संशय, भिती, अस्वथता ही होतीच. हॉस्टेलमध्ये राहण्याचा हट्टही होताच. ह्यावेळी औषधांमध्ये जरा फेरबदल करून तिला काही दिवस अजून घरीच राहावे असे युक्तिवादाने पटवून सांगितले. १५ दिवसच अजून वेळ देईन असे म्हणत ती तयार झाली.

१५ दिवसांनी औषध घ्यायला सरिताला आणणं आईला अवघड गेलं नाही. तिला स्वत:ला बदल जाणवत होता. हळू हळू तिने शेजाऱ्यांकडे काही कामानिमित्त तरी जायला सुरुवात केली. मैत्रिणींशी पुन्हा मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले. कॉलेजमध्ये नियामित जाऊ लागली. अभ्यासातील एकाग्रता सुधारली. गेले ६-८ महिने योग्य उपचार घेत असून सरिता आज बरी आहे. या वेळीच झालेल्या निदानाच व उपचारांच श्रेय नक्कीच सरिताच्या आईला जातं. सरिताच्या विरोधाला दाद न देता तिला समजावून उपचारांपर्यंत त्यांनीच आणले. एवढेच नव्हे तर शिस्तबद्ध पद्धतीनी उपचार चालू

ठेवले. स्किझोफ्रेनिफॉर्म हा स्किझोफ्रेनियाचा कमी तीव्र प्रकार आहे असे म्हणता येईल.

**Schizophreniform Disorder:**

Changes in Thinking

1. Lack of concentration
2. Hallucinations
3. Delusions/Strange ideas ( e.g. parents are stealing things or are against him/her)
4. confusion with reality

**Changes in Emotions**

1. Moody/Irritable
2. Anger outburst
3. Severe anxiety/ Fearfulness

**Changes in Behaviour**

1. Muttering to self
2. Inappropriateness
3. Poor Hygiene
4. Withdrawn/ Isolated
5. Vacant Expression (These symptoms are present from between 1 to 6 months.)

Difference between Depression / Early Signs of Schizophrenia

| DEPRESSION | EARLY SIGNS OF SCHIZOPHRENIA SCHIZOPHRENIFORM DISORDER |
|---|---|
| Sadness of mood/ Lack of Interest | Irritable behaviour / Withdrawn |
| Feels need to contact with Professionals | Does not feel need to take any help |
| Good Hygiene | Poor Hygiene |
| Touch with Reality | Confusion with reality |
| Serotonine - Imbalance | Dopamine – Imbalance |

**नेमकं मेंदुमध्ये होतं तरी काय ?**

जसे आपल्या शरिरात वेगवेगळे होर्मोन्स आहेत तसेच मेंदुमध्येही वेगवेगळे केमिकल्स स्त्रवत असतात. त्याला 'Neuro-transmitters' असे म्हणतात. ह्या स्त्रावांमध्ये असमतोल झाल्यास मानसिक आजाराची लक्षणे दिसू लागतात. उदाहरणार्थ सेरोटोनीनच्या कमतरतेमुळे डिप्रेशन हा आजार होतो, तसेच डोपामाईनच्या असमतोलामुळे स्किझोफ्रेनियाचा आजार होऊ शकतो.

१. वयात येणाऱ्या (१४/१५ वर्षांच्या) मुला-मुलींमध्ये खूप शारिरीक बदल होत असतात, अश्या वेळी मेंदुमधील केमिकेल्स मध्येही बराच बदल घडून येतो व मानसिक आजारांची लक्षणे दिसू लागतात.

२. ही लक्षणे जितक्या कमी अवधीत आढळतील, तिचे निदान होईल व उपचार होतील, तितकाच बरे होण्याची शक्यता जास्त राहते.

३. जर ही लक्षणे वाढली किंवा त्याकडे दुर्लक्ष केले गेले तर आजार गंभीर रूप धारण करू शकेल. जर हे टाळायचे असेल तर वेळेत त्रासाचे निदान व उपचार होण्याला महत्व द्यायला हवे.

In Dr. Dalaya's words: Early detection and timely intervention are key to best recovery.